महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि - ०२४४२ २२२६०३ फॅक्स - ०२४४२ २२२६०९
ई मेल- principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 "Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values." MSBTE CODE - 032

जा क्र.शा.तं.बीड/कॅन्टीन निविदा/२०२६/३१७७ दि.३१/०७/२०२६

## प्रथम मुदतवाढ

प्रति,

________________________

उपहारगृह सेवा पुरवठादार/कंत्राटदार

**विषय :-** उपहारगृह सेवेचे निविदा/दरपत्रक मागविणे बाबत.

संदर्भ :- (१) शा.तं.नि.बीड./आस्थ-१/२०२५/२५७४/ दिनांक २९/०७/२०२५ नुसार गठीत समिती.

महोदय,

शासकीय तंत्रनिकेतन, बीड या संस्थेत उपहारगृह सुरू करणे साठी सेवा इच्छुक आणि पात्र व्यक्ति/संस्था यांचे कडून विहित नमुन्यात आणि दोन लिफाफा पद्धतीने दरपत्रके/निविदा मागविण्यात येत आहेत. लिफाफा क्रमांक-१ मधे अटी व शर्ती मधील अनुक्रमान (४) नुसार मागण्यात आलेली एकूण ९ वैध कागद पत्रे ठेवण्यात यावीत तर लिफाफा क्रमांक-२ मध्ये विहित नमुन्यातील दर पत्रक योग्य ते दर भरून आणि स्वाक्षरी करून ठेवावे. सदरील दोन्ही लिफाफे सीलबंद करून एका मोठ्या लिफाफ्यात सीलबंद करून "प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड" या नावे दिनांक २५/०८/२०२६ रोजी साय.०५.०० वाजे पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील याची काळजी संबंधितांनी घ्यावी. उशिराने आलेल्या दरपत्रकांचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी. मोठ्या लिफाफ्यावर **"उपहारगृह सेवेसाठी दर पत्रक/निविदा"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

निविदा शुल्क रुपये ५००/- असून संस्थेतून रोखपाल यांच्याकडून निविदा घेते वेळेस शुल्क जमा करणे आवश्यक आहे तसेच बयाना रक्कम रुपये ५०००/- इतके असून रोख ने किंवा Demand draft स्वरूपात रोखपाल यांच्याकडे भारता येईल आणि यशस्वी निविदा धारकास त्यांच्या संमतीने सुरक्षा ठेव/अनामत रक्कम मध्ये वर्ग करता येईल.

सदरील लिफाफे दिनांक २७/०८/२०२६ रोजी दु ३.०० वाजता उपाहारगृह समिती सदस्यां समक्ष उघडण्यात येतील. उपहारगृहाचे कंत्राट देणेसाठीच्या या प्रक्रिये मध्ये प्रथम लिफाफा क्र .- १ उघडून त्या मधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या सेवा पुरवठादार/कंत्राटदारांचाच पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन बीड

खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड

दुरध्वनि - ०२४४२ २२२६०३ फॅक्स - ०२४४२ २२२६०९

ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in

DTE CODE - 2011 MSBTE CODE - 032

*"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values."*

---

लिफाफा क्र .- १ मधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या सेवा पुरवठादार/कंत्राटदारांचा लिफाफा क्र. २ उघडून खाद्य पदार्थांच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येईल आणि उच्च दर्जा व न्यूनतम दर असलेल्या कंत्राटदारास उपहारगृहा चे कंत्राट देण्यात येईल.

लिफाफा क्र .- १ मधील सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारा कोणीही सेवा पुरवठादार/कंत्राटदार उपलब्ध नसल्यास उपहारगृह समितीच्या शिफारसी नुसार काही कागदपत्रा बाबत योग्य ती सूट मुदतवाढ देण्यात येऊन सदरील प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

उपहारगृह चालविण्या संबंधीच्या अटी शर्थी आणि विहित नमुन्यातील दर पत्रक सोबत जोडले आहे. सेवा इच्छुक आणि पात्र व्यक्ति/संस्था यांनी अटी शर्थी आणि विहित नमुन्यातील दर पत्रक याची प्रिंट संस्थेची वेबसाईट http://gpbeed.ac.in/pdf/tender/ उपहारगृह 31_07_2026.pdf वरून घ्यावी.

डॉ. अ. कि. वाघमारे
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, बीड

प्रत :- (१) संस्थेचे मुख्य सूचना फलक.

(२) संस्थेची वेबसाईट.

महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन बीड**

खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड

दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०९

ई मेल – principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ – www.gpbeed.ac.in

DTE CODE - 2011 MSBTE CODE - 032

*"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values."*

### शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत उपहारगृह सुरू करणे साठीच्या अटी व शर्ती

1) उपहारगृहाची वेळ सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत राहील.

2) उपहारगृहाचे किमान दर महा भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे पत्राप्रमाणे व संस्थेत गठीत समितीच्या शिफारसी प्रमाणे प्रतिमाह ९६०/- इतके असेल,

3) कंत्राटदारास उपहारगृहाचे विजेचे बिल मासिक भाड्या व्यतिरिक्त वेगळे भरावे लागेल. त्या करीता संस्थेच्या विद्युत पुरवठ्यावरून स्वतंत्र सब मीटर व्दारे विद्युत पुरवठा दिला जाईल, त्याचे देयक १०.५० प्रती unit दरानुसार दरमहा भरावे लागेल.

4) **कंत्राटदाराकडे उपहारगृह चालविण्याकरिता खालील वैध कागदपत्रे असणे आवश्यक आहे.**

a. दुकान परवाना/ संस्था नोंदणी पत्र

b. अन्न व औषध विभागाचा परवाना

c. वस्तू व सेवा कर विभागाचा नोंदणी क्रमांक

d. PAN कार्ड

c. आधार कार्ड

f. स्थावर मालमत्तेचा पुरावा

g. कामगार आयुक्त/अधिकारी यांचे न्यूनतम मजुरी दर पत्रक

h. बाल कामगार यांची नेमणूक न करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

i. शा. त. नि. बीड या संस्थेच्या अटी व शर्ती मंजूर असल्याचे हमीपत्र.

5) उपहारगृहात कामकरणाऱ्या व्यक्तींचे ओळख विषयक कागदपत्रे संस्थेत जमा करावी लागतील.

6) उपहारगृहातील पिण्याचे पाणी शुद्ध व पिण्यायोग्य असणे आवश्यक आहे.

(7) पाण्याच्या उपलब्देतेनुसार संचेतील पाणी स्वच्छतेसाठी स्वयं पाका साठी वापरता येईल. टंचाईच्या काळात कंत्राटदारासस्व खर्चाने पाणी उपलब्ध करून घ्यावे लागेल.

8) उपहारगृहांत कंत्राटदारास cooking gas हा शासन नियमानुसार Commercial प्रकारातील वापरा लागेल.

9) उपहारगृहात आवश्यक असलेली भांडी, फर्निचर, उपकरणे, ई. सामानाची कंत्राटदारास एक खचनि व्यवस्था करावी लागेल.

10) उपहारगृहात चहा, कॉफी, शीतपेये व नाश्ता जसे समोसा, कचोरी, भेल, वड़ा, पोहे, शिरा, पराठा, नुडल्स आणि सीलबंद पदार्थ जसे की बिस्कीट, मुरमुरा चिवडा, चिप्स, ई. योग्य ती विहित मुदत असलेले ताजे, पौष्टिक व आरोग्यास हितकारक असलेले पदार्थ या व्यतिरिक्त काहीही ठेवता येणार नाही,

11) एक्सपायरी डेट/ मुदत संपलेले खाद्य पदार्थ उपहारगृहात विकण्यास बंदी असे.

12) सीलबंद खाद्य पदार्थांची किंमत छापील दरापेक्षा जास्त ठेवता येणार नाही.

13) कंत्राटदारास उपहारगृहात शासन प्रतिबंधित पदार्थ जसे की सिगारेट, तंबाखू, गुटखा, चरस, गांजा, ई. ठेवता येणारनाही,

14) उपहारगृहाची स्वच्छता कंत्राटदारास नियमित करावी लागेल.

15) उपहारगृहात विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी, पालक तसेच संस्थेशी संबंधित व्यक्ति व्यतिरिक्त इतर कोणासही प्रवेश देता येणार नाही.

16) उपहारगृहात काम करणाऱ्या व्यक्तींचा या संस्थेवर कोणताही बोजा असणार नाही.

17) उपहारगृहातील कर्मचारी कामगार यांचे वेतन हे प्रचलित किमान वेतन दरापेक्षा कमी नसावे.

18) उपहारगृहातील कर्मचारी कामगार यांना संस्थेत विनाकारण फेर फटका मारता येणार नाही.

19) उपहारगृहातील कर्मचारी कामगार यांना संस्था परिसरात/उपहारगृहात कर्तव्यावर असताना धुम्रपान/नशा करता येणार नाही किंवा अशा अवस्थेत संस्था परिसरात उपहारगृहात काम करता येणार नाही.

20) उपहारगृहातील कर्मचारी कामगार/कंत्राटदार यांची संस्थेतील विद्यार्थी, अधिकारी/कर्मचारी, ई. यांचेशी असलेली वागणूक सौजन्याची असावी.

21) उपहारगृहातील कोणत्याही प्रकारची उधारी वसूल करून देण्याची जबाबदारी सरथेची राहणार नाही.

22) उपहारगृहातील कर्मचारी कामगार/कंत्राटदार यांना उपहारगृह चालविणे शिवाय इतर कोणताही व्यवसाय संस्था परिसरात करता येणार नाही.

23) कंत्राटदारास उपहारगृहा करीता देण्यात आलेल्या जागे क्षेत्रफळा व्यतिरिक्त संस्थेचा इतर भाग वापरता येणार नाही.

24) उपहारगृहात कामकरणाऱ्या कर्मचारी/कामगार यांना संस्थेत प्रवेश करताना आणि बाहेर जाताना मुख्य गेटवरील सुरक्षा कर्मचारी यांचेकडे दैनंदिन नोंदी कराव्या लागतील.

महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०९
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 "Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values." MSBTE CODE - 032

25) कंत्राटदारास कंत्राट मंजूर होऊन सेवेचे आदेश प्राप्त झाल्याच्या तारखे पासून ८ दिवसांचे आत आपले सहमती पत्र देऊन आणि रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षा ठेव/अनामत रक्कम स्वरूपात संस्थेत भरणा करून उपहारगृह सुरू करावे लागेल.

26) अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

27) कंत्राट कालावधी संपताच तुटफुटीची किंवा इतर येणे असलेली रक्कम अनामत रक्कमेतून बजा करून उर्वरित रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल.

28) सदरील कंत्राट कालावधी हा १० महिने कालावधीचा राहील. तदनंतर कंत्राटदाराची सेवा समाधानकारक आढळल्यास सदर कंत्राट कालावधी हा पुढे एक शैक्षणिक सत्राकरिता वाढवून देता येईल परंतु अशी मुदतवाढ कोणत्याही परिस्थिती मध्ये दोन शैक्षणिक सत्रापेक्षा अधिक नसेल.

29) कंत्राट आणि वाढीव कालावधीत कंत्राटदारास खाद्यपदार्थांचे दर समितीच्या शिफारशी शिवाय वाढविता येणार नाहीत.

30) उपहारगृहाचे कंत्राट देण्या संबंधीचे सर्व अधिकार मा. प्राचार्य तथा सक्षम अधिकारी शा.त.नि. बीड यांना असतील.

31) कंत्राटदाराचा करारनामा कोणतीही पूर्व सूचना न देता अथवा कुठलेही स्पष्टीकरण न देता संपुष्टात आणण्याचे रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य तथा सक्षम अधिकारी शा.त.नि. बीड यांना असतील.

32) कंत्राट देण्याच्या या प्रक्रीये विषयी काही तक्रार असल्यास मा. प्राचार्य हे सक्षम तक्रार निवारण अधिकारी असतील.

33) उपहारगृहात प्लास्टिक कप/प्लेट/बाटी/पिशवी इत्यादी प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा वापर करता येणार नाही.

डॉ. अ.कि.वाघमारे
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, बीड

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन बीड

खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०९
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in

DTE CODE - 2011

"*Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values.*" MSBTE CODE - 032

## उपहारगृह शासकीय तंत्रनिकेतन, बीड करीता दर पत्रक

दरपत्रक धारकाचे नाव :- ____________________

दरपत्रकधारकाच्या संस्थेचे नाव :- ____________________

| अ.क्र. | खाद्य पदार्थाचे नाव व गुण वर्णन | नग/वतुमान/आकारमान | किंमत रुपयात |
|---|---|---|---|
| १ | चहा | अर्धा कप (अंदाजे ५० मिली) | |
| २ | चहा | पूर्ण कप (अंदाजे १०० मिली) | |
| ३ | दुध | अर्धा कप (अंदाजे ५० मिली) | |
| ४ | दुध | पूर्ण कप (अंदाजे १०० मिली) | |
| ५ | कॉफी | अर्धा कप (अंदाजे ५० मिली) | |
| ६ | कॉफी | पूर्ण कप (अंदाजे १०० मिली) | |
| ७ | समोसा | ५० ग्राम/०१ नग | |
| ८ | कचोरी | ५० ग्राम/०१ नग | |
| ९ | मुगवडा | ५० ग्राम/०१ नग | |
| १० | आलू वडा | ५० ग्राम/०१ नग | |
| ११ | आलू वड़ा + पाव | ५० ग्राम/०१ नग | |
| १२ | भजी | ५० ग्राम/०१ नग | |
| १३ | पोहा | ५० ग्राम/०१ नग | |
| १४ | शिरा | ५० ग्राम/०१ नग | |

महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि - ०२४४२ २२२६०३ फॅक्स - ०२४४२ २२२६०९
ई मेल- principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 MSBTE CODE - 032
"*Vision* :- To make competent Engineering Professional with Ethical core values."

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | उपमा | ५० ग्राम/०१ नग | |
| १६ | फरसाण | ५० ग्राम/०१ नग | |
| १७ | सीलबंद पदार्थ | ५० ग्राम/०१ नग | |
| 18 | केक पेस्ट्री पदार्थ | ५० ग्राम/०१ नग | |

ठिकाण :-

दिनांक :-

दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी